# दीप अमावस्या

आषाढ महिन्यातील शेवटचा दिवस अर्थात अमावस्या, जी दीप अमावस्या म्हणून साजरा करतात.

वर्षा ऋतू सुरू होतो, जेष्ठ मासाच्या मध्यमात, पावसाला सुरुवात होते आणि आषाढात ह्याच पावसाचा खरा जोर असतो. आषाढ मास पावसाचा तसाच विठुरायाच्या पंढरीच्या वारीचा. आषाढातील चांगल्या पावसाने निसर्ग बहरून आलेला असतो. सगळीकडे हिरवाई पसरलेली असते आणि मग आषाढाच्या शेवटी पाऊस कमी होतो ही श्रावणाची चाहूल असते. श्रावणात 'क्षणात येई सरसर आणि क्षणात फिरुनी ऊन पडे' असा ऊन पावसाचा खेळ सुरू होणार असतो. 'मन बावर हा श्रावण, प्रिय सजन हा श्रावण' अश्या मनमोहक श्रावणाच्या आगमनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच आषाढातील अमावास्येला 'दीप अमावस्या' म्हणतात.

आप, तेज अर्थात अग्नी, जल, पृथ्वी, आकाश ह्या पंचमहाभूतांपैकी अग्नी हे महत्वाचे महाभूत. आपल्या संस्कृतीत कुठल्याही धार्मिक कार्यात अग्नी प्रज्वलन हा महत्वाचा विधी होय. किंबहुना अग्नी प्रज्वलन केल्याशिवाय कोणत्याही धार्मिक विधीला सुरुवात होत नाही. तिन्हीसांजेला, दिवे लावत सायंकाळी,

शुभंकरोती कल्याणम् ।आरोग्यम् धनसंपदा ।।
शत्रुबुद्धी विनाशय । दिपज्योति नमोस्तुते ।।

ह्या प्रार्थनेने दिव्यास नमस्कार करत, कृतज्ञता व्यक्त करण्याचा संस्कार लहानपणी केला जातो. हा बालसंस्काराचा एक भाग आहे.

पूजा विधीस सुरुवात करताना, समईची वात प्रथम प्रज्वलित केली जाते. आरतीच्या वेळी निरांजनाची फुलवात पेटवली जाते आणि प्रसन्न अंतःकरणाने आरती केली जाते. आरती नंतर धुपारती, कर्पूरार्ती असे धार्मिक विधीत दिव्याचे अनन्यसाधारण महत्व आहे. आजही दक्षिण भारतातील मोठमोठ्या मंदिरातील गाभारा, समईच्या उजेडाने उजळून निघतो. त्या समईच्या प्रकाशातील उजळलेल्या गाभाऱ्यातील मूर्तीचे दर्शन विलोभनीय असते.

पूर्वीच्या काळी वीज नव्हती. सायंकाळी घरात कंदील, पणती, लमाणदिवे, मातीचे दिवे इ. दिव्यांनी घर उजळून निघत असे. त्यामुळे संध्याकाळच्या वेळेला 'दिवेलावणीची वेळ' हा एक परवलीचा शब्द आहे. ज्या दिव्याच्या प्रकाशाने आपली अंधारातून मुक्तता होते त्या दिव्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'दीप पूजन' करण्याची प्रथा सुरू झाली तीच ही 'दीप अमावस्या'.

ह्या अमावस्येच्या पूर्वसंध्येला गृहिणी घरातील सगळे दिवे धुवून पुसून साफ करतात आणि त्या सगळ्या दिव्यांची सायंकाळी विधिवत पूजा करत ही दीप अमावस्या साजरी करतात.

आज दुर्दैवाने ह्या दीप अमावास्येला 'गटारी अमावस्या' असे नामकरण करत, हा दिवस जणू मद्यपान आणि मांसाहारासाठी एक 'उत्तम मुहूर्त' असल्याचे भासवले जाते. श्रावण महिना हा व्रत वैकल्यांचा, सणवारांचा महिना त्यामुळे साहजिकच सामिष भोजन तसे व्यर्ज. खरं प्रकृतीच्या दृष्टिकोनातून विचार केला तर दमट हवामान, पावसाळी हवा त्यामुळे पचनास पूरक वातावरण नसते त्यामुळे उपवास करण्याची पद्धत आहे. त्यानंतर भाद्रपदात गौरी गणपती असतात त्यामुळे सामिष भोजन प्रिय असलेल्या व्यक्तींना हा मोठा वर्ज्य काल असतो. त्या पार्श्वभूमीवर आषाढातील शेवटच्या दिवशी लोक सामिष भोजन घेत असावेत परंतु त्यासोबत मद्यपान करणे ही काही समर्थनीय बाब असू शकत नाही. पवित्र श्रावण महिन्याच्या पूर्व संध्येला गताहार सुरू करण्यासाठी 'गताहरी अमावस्या' मानली जाते त्याच शब्दाचा अपभ्रंश झाला आणि 'गटारी अमावस्या' हे सोईस्कर नामकरण झाले असावे.

खरं तर शास्त्र कधीच दारू प्यायला अथवा मद्यप्राशन करण्यास सांगत नाही अथवा अभक्ष भक्षण करण्यास उद्दीपित करत नाही. कठोर परिश्रम करणाऱ्या लोकांना पूरक आहार मिळावा आणि त्यांच्यासाठी श्रम परिहार असावा ह्या दृष्टिकोनातून कदाचित सामिष भोजनाची सुरुवात झाली असावी. त्यामुळे मोठे समारंभ, लग्न समारंभ, सार्वजनिक धार्मिक विधी यथोचित पार पाडल्यानंतर, झालेल्या अतिरिक्त शिणवटा घालवण्यासाठी, पूरक आहार म्हणून सामिष भोजनाची प्रथा असावी. मात्र पुढील दोन महिन्यात मांसाहार करता येणार नाही, ह्या भावनेतून आषाढी अमावास्येचा मुहूर्त साधत मांसाहाराचा आस्वाद घेणे समर्थनीय आहे मात्र त्यासोबत मद्यपान करणे अजिबात समर्थनीय नाही. मद्यपान करत, अति मद्यपानात झिंगत लोळत पडणे आणि त्यासाठी त्या दिवसाला 'गटारी अमावस्या' नामकरण करत, 'गटारी' साजरी करणे ही जणू अयोग्य प्रथा पडली आहे.

आपल्या संस्कृतीत दिव्यांचे अनन्यसाधारण महत्व आहे. अंधारात प्रकाशमान करणे इथपर्यंत दिव्यांचे महत्त्व मर्यादित नसून दिवे हे जणू ज्ञानाचे प्रतीक आहेत. अज्ञानाच्या अंधःकारापासून मुक्तता करण्यासाठी दीप प्रज्वलित करणे हा संकेत आहे.
बृहदारण्यक उपनिषदात, सोम यज्ञात स्तुतिरुपी मंत्र म्हटला जातो.

"ओम असतो मा सद् गमय ।
मृतोऽमः अमर्त्य गमय ।
तमसो मा जोतिर्गमय ।।"

ह्या श्लोकात देवाकडे प्रार्थना केली जाते,

'माझी असत्याकडून सत्याकडे, मृत्यूकडून अमरत्वाकडे, अंध:कारकडून प्रकाशाकडे वाटचाल सुरू ठेव.'

**-मनोज कुरुंभटी**